सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणे बाबत.( श्री. संदिप बाबुराव बळीद तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत खांडके, ता. नगर हल्ली कार्यरत पं.स.पारनेर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आदेश ग्रामपंचायत विभाग-ग्रांप ३/ क्र. ९८८०४४९
दिनांक / /~~२०२४~~ ०८/१०/२०२४

संदर्भ- १. या कार्यालयाचा आदेश क्र.साप्रवि२/ग्रांप-३१८०२०२४ अहमदनगर दिनांक१५/०४/२०२४,(शिक्षा केलेचा आदेश रदद )

२. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र. डिईएन१८९५/१६५९/प्र.क्र.१२०/२०, दिनांक-२४/११/१९९५

३. महाराष्ट्र नागरी सेवा सेवा (पदग्रहण अवधी स्थियेत्त सेवा निलंबन व बडतर्फ यांचे काळांतील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ७२ चे (५) (७)

४.या कार्यालयाची नोटीस जा.क्र/साप्रवि -२/ग्रांप-३/२६०/२०२४ दिनांक ०३/०७/२०२४ (सेवानिलंबन कालावधी निर्णय घेणे नोटीस )

५.श्री. संदिप बाबुराव बळीद ग्रामसेवक यांचा खुलासा दिनांक ०९/१०/२०२४

संदर्भ क्रमांक ०४ अन्वये श्री.संदिप बाबुराव बळीद तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत खांडके ता. नगर हल्ली कार्यरत पं.स.पारनेर यांना दिनांक २३/०८/२०१८ ते दिनांक १९/०८/२०१९ अखेरचा सेवा निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व कारणांसाठी कामावर व्यतीत न केलेला कालावधी म्हणून का समजणेत येऊ नये? या बाबतची नोटीस देण्यात आलेली आहे.

संदर्भ क्रमांक ०५ अन्वये श्री.संदिप बाबुराव बळीद यांनी सदर प्रकरणी खुलासा सादर केला की, मी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील ३ चा भंग केलेला नसले बाबत चौकशी दरम्यान सिध्द झालेले आहे. याचाच अर्थ मी तत्त्कालीन वेळी व आजही कायम निर्दोष आहे.(एकूण ३६२ दिवसाचा कालावधी)अर्थात ११ महिने २६ दिवस इतका वाढविण्यास मी जबाबदार नाही .मी वेळोवेळी आपले जि.प.अमदनगर सेवेत मला ग्रामसेवक पदावर पुर्नस्थापित करणे बाबत वेळोवेळी लेखी पत्र दिले आहेत. माझेवरील आरोप सिध्द होत नाही असे न्यायदान प्राप्त आहे. विंनती की,दिनांक २३/०८/२०१८ ते दिनांक १९/०८/२०१९ हा सेवा निलंबन कालावधी सेवेच्या सर्व कारणासाठी कामावर व्यतीत केलेला कालावधी म्हणुन धरण्यात यावा.

श्री.संदिप बाबुराव बळीद ग्रामसेवक यांचा गैरवर्तनाबाबतचे आरोपांचे शिक्षेचा आदेश संदर्भ क्रमांक ०१ अन्वये जिल्हा परिषदेमार्फत रदद करण्यात आल्याने यांचा खुलासा अशःता मान्य करण्यात येत असुन सेवा निलंबन कालावधीचा निर्णयघेणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा निलंबन व बडतर्फ यांचे काळांतीलप्रदाने) नियम १९८१ चा नियम ७२ चे (५) (७) मधील तरतूदीनुसार श्री.संदिप बाबुराव बळीद तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत खांडके ता. नगर हल्ली कार्यरत पं.स.पारनेर यांचा दिनांक २३/०८/२०१८ ते दिनांक १९/०८/२०१९ अखेरचा सर्व सेवा निलंबित कालावधी हा सेवेच्या सर्व कारणांसाठी कामावर व्यतीत केलेला कालावधी म्हणून समजणेत यावा.

सदर आदेशाची नोंद संबधीताचे सेवा पुस्तकात घेण्यात यावी. या आदेशाप्रमाणे पुढील नियमोचित कार्यवाही संबधीत कार्यालय प्रमुख यांनी करावी. सदरचा आदेश जिल्हा परिषद अहिल्यानगर www.[illegible]nagarzp.gov.in चे संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक २०२५१००९०६०१३८ असा आहे.

Signed by Anand Subhashlal Bhandari
Date: 09-10-2025 21:35:26

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति- श्री. संदिप बाबुराव बळीद तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत खांडके ता. अहिल्यानगर हल्ली कार्यरत पं.स.पारनेर
द्वारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर.
प्रत – गट विकास अधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर पुढील कार्यवाहीसाठी .